# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ३६२३/२०२२

**अपिलार्थी, श्री.गणेश पांडुरंग बोरजी,**
ब्लॉक नं.३, वार्ड नं.१७, शिवाजी नगर कोळीवाडा,
मुरूड जंजिरा, जि.रायगड ४०२ ४०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग,
मुरुड जंजिरा नगरपरिषद, लोकमान्य टिळक रस्ता,
मुरुड जंजिरा , जि.रायगड ४०२ ४०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,
मुरुड जंजिरा नगरपरिषद, लोकमान्य टिळक रस्ता,
मुरुड जंजिरा , जि.रायगड ४०२ ४०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २४.११.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.०८.२०२२ | -- | ०२.०९.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २०.१२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" मागीतलेली माहिती मिळाली नाही"*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २४.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी व तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"

*१) मराठी शाळा क्र.२ च्या जवळ असलेली मुळ इमारत पाडून मुरंड जंजिरा नगरपरिषदेची नवीन कार्यालयाची इमारत बांधली आहे. या इमारतीच्या बांधकामाला CRZ ची परवानगी घेतली आहे का ? CRZ ची परवानगी घेतली असल्यास ते परवानगी पत्राची नक्कल प्रत मिळावी.*

*२) मुरुड जेजिरा पोलीस स्थानक, जकात नाका जवळ, मुरुड जंजिरा नगरपरिषदची तातुपरत्या बांधलेल्या कार्यालय इमारतींना CRZ ची परवानगी होती का? परवानगी असल्यास CRZ च्या परवानगी पत्राची नक्कल प्रत मिळावी."*

अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. त्यांना दि.२४.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, त्यांनी अपेक्षिलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची होत आहे. माहिती अधिकारात अभिलेखातील माहिती मागणे अपेक्षित आहे. तरी आपणास आवश्यक असल्यास, या कार्यालयात समक्ष येऊन कार्यालयातील अभिलेखातील माहिती पडताळावी. समक्ष अभिलेख पडताळणी केल्यानंतर आपणास आवश्यक असलेली माहिती देण्यात येईल. याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही किंवा कोणतेही आदेश पारित केले नाही.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी कोणतीही प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागीतली नाही. त्यांनी मराठी शाळा क्र.२ च्या बाजुला तसेच मुरुड जंजिरा पोलीस ठाणे जकात नाका जवळ मुरुड जंरिा नगरपरिषदेची तात्पुरत्या बांधलेल्या कार्यालय इमारतींना सी.आर.झेड. ची परवानगी घेतली आहे का? असल्यास परवानगीची प्रत मागीतली होती. या माहितीमध्ये कोणत्याही स्वरुपात जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारले नाहीत किंवा त्यांचे मत मागीतले नाही. माहिती अतिशय स्पष्ट स्वरुपात मागीतली आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी सी.आर.झेड. ची परवानगी घेतली असल्यास, त्याची प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अशी परवानगी घेतली नसल्यास त्याप्रमाणे वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कळविता आली असती. तथापि या दोन्ही बाबी न करता मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे असा चुकीचा निष्कर्ष जन माहिती अधिकारी यांनी काढला व अपिलार्थी यांना माहिती नाकारली आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखील कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

वरिल विवेचन लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भात वस्तुस्थितीदर्शक उत्तर विनामुल्य पुरविणे योग्य होईल. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे

शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेल्या माहिती संदर्भात वस्तुस्थितीदर्शक उत्तर १५ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावे.**

२. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, मुरुड यांनी अपीलार्थी यांनी दिनांक ०१.०८.२०२२ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०१.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २४ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, लोकमान्य टिळक रस्ता, मुरुड जंजिरा , जि.रायगड ४०२ ४०१.

**- यांना प्रत**

विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,
मुरुड जंजिरा नगरपरिषद, लोकमान्य टिळक रस्ता,
मुरुड जंजिरा , जि.रायगड ४०२ ४०१. **यांचे मार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक ०७.०१.२०२६ ( In Continuation of order dt. २४.११.२०२५)

## विवेचन

उपरोक्त दि.२४.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०७.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.पंकज अनिल भुसे, मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, मुरुड उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.पंकज अनिल भुसे, मुख्याधिकारी, मुरुड-जंजिरा नगरपरिषद, मुरुड-जंजिरा यांनी त्यांचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, प्रथम अपिलास अनुसरुन दि.०७.०९.२०२२ रोजी अपील सुनावणीची नोटीस काढून दि.१५.०९.२०२२ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात येऊन दि.१७.०९.२०२२ रोजी आदेश पारित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशाची प्रत तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.पंकज अनिल भुसे यांनी सादर केली आहे. यावरुन तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर आदेश पारित केले असल्याचे दिसून येत आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, मुरुड जंजिरा नगरपरिषद, मुरुड-जंजिरा यांनी अपिलार्थी यांना आयोगाच्या दि.२४.११.२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, मुरुड जंजिरा नगरपरिषद, मुरुड-जंजिरा यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.पंकज अनिल भुसे, मुख्याधिकारी, मुरुड-जंजिरा नगरपरिषद, मुरुड-जंजिरा यांनी सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांचेवरिल प्रस्तावित शिस्तभंगाची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, मुरुड जंजिरा नगरपरिषद, मुरुड-जंजिरा यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०१.०८.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या दि.२४.११.२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५.०२.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ जानेवारी, २०२६.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ